# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सोलापुर ग्रामीण  **P.S.**(ठाणे): मंगळवेढा

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0488  **Year** (वर्ष): 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):28/06/2024 20:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन  **Date From** (दिनांक पासून): 27/06/2024

**Time Period** (कालावधी):  **Date To** ( दिनांक पर्यंत): 28/06/2024

**Time From** (वेळेपासून): 12:30 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:27 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 28/06/2024  **Time** (वेळ): 20:04 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 035

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 28/06/2024 20:04 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

दक्षिण, 1 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): उपविभागीय अधिकारी , कार्यालय ,मंगळवेढा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शारुख शाहाजन काजी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्राथमिक आरोग्य केंद्र मागे,भीम नगर, नाझरे ,सांगोला,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्राथमिक आरोग्य केंद्र मागे,भीम नगर, नाझरे ,सांगोला ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाश विश्वनाथ सगर | | | 1. नवीन आरटीओ ऑफिस,,स्मृती विहार घर नं 29, ,सोलापूर, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत<br>2. भुसणे, ,उमरगा, ,धाराशिव, धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विवेक विठ्ठल ढेरे | | | 1. नितीन किल्लेदार यांचे घरी, भाडाने, किल्ला बाग, ,मंगळवेढा, मंगळवेढा,सोलापुर ग्रामीण, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | महाराष्ट्र,भारत<br>2. 23/177, सावली हौसिंग, सोसायटी, गंगानगर इचलकरंजी, हतकणंगले जि कोल्हापूर , कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

फिर्याद    दि:28/06/2024
मी शारुख शाहाजन काझी, वय - 29, व्यवसाय - शेती, रा. प्राथमिक आरोग्य केंद्र मागे, भीम नगर, नाझरे ता. सांगोला, जि. सोलापूर, शिक्षण (12 वी) मो.क्रं. 7558539813, समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की, मी दि. 26/06/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक, श्री उमाकांत महाडिक यांचेशी संपर्क साधुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 26/06/2024 रोजी 12.00 वा. मंगळवेढा एमआयडीसी येथे येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने आले. तेथे पोनि महाडिक यंानी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,
दि. 02/03/2020 रोजी माझी टाटा कंपनीच्या मेगा एसी वाहन क्रं. एम एच 45, ई एफ 0673 ही गाडी विनापरवाना वाळु वाहतुक करीत असताना तलाठी यांनी पकडली असुन सदर गाडीवर तहसिलदार यांनी 1,37,684/- रुपये शासकीय दंड आकारला होता. सदरचा दंड हा मी दि. 14/05/2024 रोजी शासकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा सांगोला येथे भरला असुन त्याची पावती तहसिल कार्यालय सांगोला येथे जमा केली. त्यावर तहसिल कार्यालय सांगोला येथील लिपिक यांनी मला जप्त वाहन सोडण्याकरीता मा. उपविभागीय अधिकारी, विभाग मंगळवेढा यांची परवानगी आवश्यक असते असे सांगीतले. त्यावरुन मी दि. 22/05/2024 रोजी मा. उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग, मंगळवेढा यांना वाहन सोडणेबाबतचा अर्ज, स्टँप व इतर कागदपत्रे सादर केला असुन सदर अर्जावरुन माझे जप्त वाहन सोडण्याची परवानगी देण्याकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथील नायब तहसिलदार सगर व महसुल सहा. ढेरे हे माझ्याकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन मा. उपविभागीय अधिकारी कार्यालय मंगळवेढा येथील नायब तहसिलदार सगर व महसुल सहा. ढेरे यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली. व सदरची तक्रार स्व:हस्तक्षरात लिहुन दिली.
त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन नायब तहसिलदार सगर व महसुल सहा. ढेरे यांचेवर उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहीती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्या मोटारसायकलवरुन उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे पाठविले. त्याप्रमाणे आम्ही उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा गेलो असता तेथे नायब तहसिलदार सगर उपस्थित होते. त्यांचेशी मी माझ्या प्रलंबित कामाची चर्चा करीत असताना तेथे महसुल सहा. ढेरे हे देखील आले. सदर ठिकाणी नायब तहसिलदार सगर व महसुल सहा. ढेरे यांचेशी माझ्या प्रलंबित कामाची चर्चा झाल्यानंतर त्या दोघांनी मला उपविभागीय अधिकारी श्री माळी साहेबांना भेटण्याकरीता सांगीतले. परंतु माळी साहेब हे कार्यालयात नसल्याने मी पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली. उपविभागीय अधिकारी साहेब कार्यालयात उपस्थित नसल्याने पोनि महाडिक यांनी सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत केली.

दि. 27/06/2024 रोजी पोनि महाडिक यांचे सुचनेप्रमाणे मी सकाळी 12.00 वा. मंगळवेढा एमआयडीसी येथे उपस्थित झालो. तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने उपस्थित झाले. तेथे वाहनात दि. 26/05/2024 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम केलेले दोन्ही पंच उपस्थित होते. सदर ठिकाणी वाहनामध्ये पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये दि. 26/06/2024 रोजी पडताळणी कारवाईमध्ये वापरण्यात आलेले मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी माझ्या विनंतीवरुन माझ्यासोबत पडताळणी कारवाईकरीता पंच 02 यांना पाठविण्याचे ठरविले. व मला तसेच पंच 02 यांना योग्य त्या सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 2 यांना माझ्या मोटारसायकल वरुन उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे पाठविले. त्याप्रमाणे आम्ही उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे जावुन उपविभागीय अधिकारी श्री माळी यांना भेटुन माझे जप्त वाहन सोडणेबाबत विंनती केली. त्यावर उपविभागीय अधिकारी माळी साहेब यांनी मला महसुल सहा. ढेरे यांना भेटण्याकरीता सांगीतले.

त्याप्रमाणे मी ढेरे यांना भेटण्याकरीता गेलो असता तेथे ढेरे दिसुन आले नाहीत त्यामुळे मी नायब तहसिलदार सगर यांना भेटुन साहेबांनी ढेरे यांना भेटण्याकरीता सांगीतले असल्याबाबत सांगीतले. त्यावर सगर यांनी मला बाहेर थांबण्याकरीता सांगीतले त्यामुळे मी ढेरे यांची बाहेर वाट बघत थांबलो. त्यानंतर त्यांची जेवणाची सुट्टी झाल्याने मी पंच यांचेसोबत पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 02 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

त्यानंतर काहीवेळ वाट पाहुन पोनि महाडिक यांनी पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 2 यांना माझ्या मोटारसायकल वरुन उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे पाठविले. त्याप्रमाणे आम्ही उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे जावुन ढेरे यांना भेटलो व त्यांना मी प्रांत साहेबांना भेटलो असता त्यांनी तुम्हाला भेटण्याकरीता सांगीतले असल्याबाबत सांगीतले. त्यावर ढेरे यांनी माझी गाडी सोडण्याची परवानगी देण्याकरीता साहेबांकरीता म्हणुन उपविभागीय अधिकारी श्री माळी यांचेकरीता म्हणुन 20,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी लाच रक्कमे मध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता ढेरे यांनी तुच साहेबांना भेटुन बोल असे म्हणु लागले. त्यानंतर तेथे जवळच असलेले नायब तहसिलदार सगर यांनी आमचे मध्ये मध्यस्ती करुन मला 10,000/- रुपये देण्यास सांगीतले. त्यावर मी लगेच घेवुन येतो असे म्हणुन पंच यांच्यासह पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 02 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

झाले पडताळणी कारवाईमध्ये महसुल सहा. ढेरे यांनी उपविभागीय अधिकारी श्री माळी यांचेकरीता म्हणुन माझ्याकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याने उपविभागीय अधिकारी श्री माळी यांची देखील पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यावर सध्या उपविभागीय अधिकारी श्री माळी हे कार्यालयात नसल्याबाबत मी पोनि महाडिक यांना सांगीतले. त्यावरुन पोनि महाडिक यांनी सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत करुन दि. 28/06/2024 रोजी उपविभागीय अधिकारी श्री माळी यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले.

दि. 28/06/2024 रोजी पोनि महाडिक यांचे सुचनेप्रमाणे मी सकाळी 11.00 वा. मंगळवेढा एमआयडीसी येथे उपस्थित झालो. तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने उपस्थित झाले. तेथे वाहनात पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम केलेले दोन्ही पंच उपस्थित होते. सदर ठिकाणी उपविभागीय अधिकारी श्री माळी यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर मला तसेच पंच 02 यांना योग्य त्या सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 2 यांना माझ्या मोटारसायकलवरुन उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे पाठविले. त्याप्रमाणे आम्ही उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे जावुन ढेरे यांना भेटलो

असता त्यांनी मला उपविभागीय अधिकारी श्री माळी यांची भेट घेण्याकरीता सांगीतले. त्याप्रमाणे मी उपविभागीय अधिकारी श्री माळी यांची भेट घेवुन माझे जप्त वाहन सोडण्याच्या परवानगीच्या अनुषंगाने ढेरे यांनी 20,000/- रुपयांची मागणी केली असल्याबाबत सांगीतले. त्यावेळी श्री माळी यांनी फाईल ठेवायला सांगा असे म्हणुन मला कोणालाही पैसे देवु नको असे सांगीतले.

त्यामुळे मी व पंच असे उपविभागीय अधिकारी श्री माळी यांचे कक्षातुन बाहेर येवुन पुन्हा ढेरे यांची भेट घेवुन साहेबांनी फाईल ठेवायला सांगीतले असल्याबाबत सांगीतले. त्यावर ढेरे यांनी चल माझ्यासोबत असे म्हणुन पुन्हा माळी साहेबांची भेट घेण्याकरीता घेवुन गेले. तेथे माळी साहेबांनी माझ्या फाईलवर सही करुन ढेरे यांच्याकडे दिली. त्यावर आम्ही माळी साहेबांच्या कक्षातुन बाहेर येवुन ढेरे यांच्या टेबलकडे गेलो. तेथे ढेरे यांनी नायब तहसिलदार सगर यांना माझ्याकडे हात करुन काय करायचं याच असे विचारले त्यावर सगर यांनी घे ना असे म्हणाले त्यावर ढेरे यांनी माझ्याकडे बघुन हाताने पैसे मागणीचा इशारा करुन काय झालं असे विचारले त्यावर मी त्यांना काल एटीएम मध्ये बॅलन्स नसल्याचा बहाणा सांगुन अता घेवुन येतो असे सांगीतले त्यावर ढेरे यांनी होकार देवुन मला काल दि. 27/06/2024 रोजी ठरल्याप्रमाणे 10,000/- रुपये लाच रक्कम घेवुन येण्यास सांगीतले. त्यावर मी पंच 02 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 02 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली. त्यानंतर नायब तहसलिदार सगर व महसुल सहा. ढेरे यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सर्व सापळापुर्व कार्यवाही पुर्ण केली. व मी हजर केलेली लाच रक्कम 10,000/- रुपयांच्या नोटांना अ◌ॅथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टच्या डावे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. व नायब तहसलिदार सगर व महसुल सहा. ढेरे यांचेवर उपविभागीय अधिकारी कार्यालय मंगळवेढा येथे सापळा कारवाई करण्याकरीता पोनि महाडिक यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 2 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा येथे रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 01 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन येवुन उपविभागीय अधिकारी कार्यालय मंगळवेढा परिसरात सापळा लावुन थांबले.

मी व पंच 02 असे सदर ठिकाणी गेलो असता तेथे ढेरे उपस्थित होते. त्यांनी मला बघुन त्यांच्या कार्यालयीन खोलीच्या पाठीमागील दरवाज्यात घेवुन गेले व तेथे माझ्यासमोर हात पुढे केला. त्यावर मी माझ्या शर्टच्या डावे बाजुच्या खिशामध्ये ठेवण्यात आलेली लाच रक्कम काढुन त्यांना दिली व दहा आहेत मोजुन घ्या असे म्हणालो. त्यावर ढेरे यांनी दहा नको पाच द्या असे म्हणाले. त्यावर मी लाच रक्कमेतील 5,000/- रुपये मोजुन ढेरे यांना दिलो व मोजुन घ्या असे म्हणालो त्यावर ढेरे यांनी सदरची लाच रक्कम 5,000/- रुपये उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे नसते पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. व माझे वाहन सोडण्याच्या आदेशाची प्रत मला दिली. त्यावेळी पंच 02 यांनी पोहवा घाडगे यांना फोन करुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला. त्यावरुन पोनि महाडिक, पंच 01 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन त्यांनी नायब तहसिलदार सगर व महसुल सहा. ढेरे यांना पकडले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी नायब तहसिलदार सगर व महसुल सहा. ढेरे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता नायब तहसिलदार सगर यांनी त्यांचे नाव प्रकाश विश्वनाथ सगर, वय 55 वर्षे, पद - नायब तहसिलदार, (वर्ग- 2) नेम- उपविभागीय अधिकारी कार्यालय मंगळवेढा सध्या रा. नवीन आर.टी.ओ ऑफिस, स्मुती विहार घर नं. 29, सोलापूर जि. सोलापूर मुळ रा. भुसणे, ता. उमरगा, जि. धाराशिव. तसेच महसुल सहा. ढेरे यांनी त्यांचे नाव विवेक विठ्ठल ढेरे, वय 32 वर्षे, पद - महसुल सहाय्यक, (वर्ग- 3) मुळ नेम- तहसिल कार्यालय सांगोला प्रतिनियुक्तीने उपविभागीय अधिकारी कार्यालय मंगळवेढा सध्या रा. श्री. नितीन किल्लेदार यांचे घरी भाड¬◌ाने, किल्ला बाग, मंगळवेढा जि. सोलापूर मुळ रा. 23/177, सावली हौसिंग सोसायटी, गंगानगर इचलकरंजी ता. हतकणंगले जि. कोल्हापूर असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी कार्यालयीन खोलीमध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही मंगळवेढा पोलीस ठाणे येथे पूर्ण करण्यात आली. तरी दि. 27/06/2024 रोजीचे 12.30 ते दि. 28/06/2024 रोजीचे 13.27 दरम्यान आरोपी लोकसेवक प्रकाश विश्वनाथ सगर, पद - नायब तहसिलदार, व विवेक विठ्ठल ढेरे, पद - महसुल सहाय्यक दोघे नेमणुक उपविभागीय अधिकारी कार्यालय, विभाग मंगळवेढा यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरूपयोग करून माझे जप्त वाहन सोडण्याची परवानगी आदेश देण्याकरीता स्वत:करीता तसेच उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा श्री माळी यांचेकरीता म्हणुन 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रु लाचेची मागणी केली व त्यापैकी 5,000/- रुपये लाच रक्कम महसुल सहा. ढेरे यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय मंगळवेढा येथील त्यांच्या

कार्यालयीन खोलीत स्वत: स्विकारुन बेकायदेशीर वर्तन केले आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक 1) प्रकाश विश्वनाथ सगर, पद - नायब तहसिलदार, 2) विवेक विठ्ठल ढेरे, पद - महसुल सहाय्यक दोघे नेमणुक उपविभागीय अधिकारी कार्यालय, विभाग मंगळवेढा यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
RANJEET NARAYANRAO MANE(I (Inspector)) / DCPS151010000402RNMM7801H **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Skay

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

FIR प्रत मिळाली
Skay
28/06/2024

HC 408
ठाणे अंमलदार
मंगळवेढा पोलीस ठाणे
HC/408 कांबळे T.B.

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RANJEET NARAYANR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DCPS15101000402RNM